**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ०६ एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या**

1. **राज्यसभेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी; ज्येष्ठ नेते शरद पवार आणि रामदास आठवले यांनी घेतली सदस्यत्वाची शपथ.**
2. **भाजप कोणत्याही धर्मा विरोधात नसल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं भाजपच्या ४४ व्या स्थापना दिन कार्यक्रमात प्रतिपादन.**
3. **बुलढाणा जिल्ह्यातील लोणार इथं उद्या योग महोत्सवाचं आयोजन, 7 हजारांपेक्षा अधिक योग साधक होणार सहभागी.**
4. **नागपूर जिल्ह्यात प्रथमच बुटीबोरी औद्योगिक परिसरात येत्या १० एप्रिलपासून पीएनजी पुरवठा सुरू केला जाणार.**

---------------------------------------------------

नवनिर्वाचित सदस्य शपथ

राज्यसभा सभापती सी.पी.राधाकृष्णन यांनी आज नवनिर्वाचित सदस्यांना शपथ दिली. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. या दोन्ही नेत्यांची महाराष्ट्रातून सभागृहावर पुन्हा निवड झाली आहे. तसंच नवनिर्वाचित खासदार माया इवनाते, ज्योती वाघमारे आणि रामराव वडकुते या राज्यातून निवडलेल्या सदस्यांनीही आज शपथ घेतली.

---------------------------------------------------

भाजप स्थापना दिवस

भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिवस आज साजरा होत आहे. त्यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातल्या सर्व कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. समाजसेवेत नेहमी आघाडीवर राहणारा पक्ष म्हणून ‘देश प्रथम’ या तत्त्वावर भाजप कार्य करत आहे. कार्यकर्त्यांची निःस्वार्थ सेवा, अटळ समर्पण आणि सुशासनाबद्दलची निष्ठा हीच पक्षाची खरी ताकद असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. नागपुरातही आज भारतीय जनता पक्षाचा ४४ वा स्थापना दिन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. भाजप

मुस्लिमविरोधी असल्याचा दावा पूर्णपणे असत्य असल्याचं गडकरी यावेळी आपल्या संबोधनात म्हणाले. भाजप कोणत्याही धर्मा विरोधात नाही, देशाच्या परंपरा आणि सर्वांचं कल्याण होवो, या धारणेवर पक्षाचा विश्वास असल्याचं त्यांनी सांगितलं .

***(होल्ड बाईट - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी - ४० सेकंद)***

भारतीय जनता पक्षाच्या स्थापने पासूनचा प्रवास संघर्षमय राहिला आहे. अनेक अडचणींवर मात करत पक्षाने आज देशात मजबूत स्थान निर्माण केल आहे, असं गडकरी म्हणाले. यावेळी त्यांनी पक्षासाठी आयुष्य वेचलेल्या लाखो कार्यकर्त्यांचे आभार मानले. शून्यातून पक्ष उभा करणाऱ्या आणि आज आपल्यात नसलेल्या कार्यकर्त्यांच्या योगदानाचे स्मरण करत गडकरी यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. दरम्यान, भारतीय जनता पक्ष, जिल्हा चंद्रपूर तर्फे गांधी चौक येथील मनपाच्या खुल्या जागेत सायंकाळी 7 वाजता आमदार डॉ.सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

---------------------------------------------------

प्रतापराव जाधव

बुलढाणा जिल्ह्यातील लोणार इथं उद्या 'योग महोत्सव २०२६' चं आयोजन करण्यात आलं असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असं आवाहन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या १०० दिवसांच्या काउंटडाऊन अंतर्गत हा कार्यक्रम जगप्रसिद्ध लोणार सरोवर येथील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात होणार आहे. या बद्दल सविस्तर महिपती मंत्री जाधव यांनी दिली आहे..

***(होल्ड बाईट - प्रतापराव जाधव ४० सेकंद)***

या महोत्सवात सुमारे ७ हजारांहून अधिक योग साधक सहभागी होणार असून एकाच वेळी त्रिकोणासन करून विक्रम नोंदवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या कार्यक्रमात विविध योग संस्था, शाळकरी विद्यार्थी, महिला बचत गट तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. योग हा केवळ व्यायाम नसून शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल साधणारी जीवनशैली असल्याचं जाधव म्हणाले. निरोगी आणि आनंदी जीवनासाठी योग अंगीकारावा आणि या ऐतिहासिक उपक्रमाचा भाग व्हावे, असं आवाहनही त्यांनी केलं.

---------------------------------------------------

सुनेत्रा पवार

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी उमेदवारी अर्ज भरला. ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी कोणत्याही पक्षाच्या उमेदवारांनी आपले अर्ज दाखल करु नयेत अशी विनंती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आमदार रोहित पवार यानी केली आहे. बारामती मधे पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान होत आहे. माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणी एफआयआर दाखल केला तर बारामती विधानसभा निवडणुकीच्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेस उमेदवाराचा अर्ज मागे घेतला जाऊ शकतो, असं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीनं आज स्पष्ट केलं.

---------------------------------------------------

जिल्हाधिकारी पदभार

कुमार आशीर्वाद यांनी आज जिल्हाधिकारी तथा मनपा आयुक्त डॉ.विपीन यांच्याकडून नागपूर जिल्हाधिकारी पदाची सूत्रे स्वीकारली. तर डॉ.प्रवीणकुमार देवरे यांनी आज बुलढाणा जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी म्हणून अधिकृतपणे पदभार स्वीकारला. जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात डॉ.देवरे यांचं स्वागत करून प्रशासकीय सूत्रे त्यांच्याकडे सुपूर्द केली.

---------------------------------------------------

मंत्रालय पत्रकार परिषद

राज्यात इंधन पुरवठ्यात कोणताही तुटवडा नाही असं नियंत्रक रेशनिंग आणि पेट्रोलियम उत्पादनासंबंधीचे मुख्याधिकारी चंद्रकांत डांगे यांनी स्पष्ट केलं आहे. शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्याची स्थिती सांगण्यासाठी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. महाराष्ट्रात पेट्रोल आणि डिझेल यांचा पुरवठा सुरळीत आहे. सुरुवातीला पेट्रोल पंपावर गर्दी करणारे अधिकतर लोक पॅनिक बायिंग त्यांनी करत होते मात्र आता पेट्रोल पंपावर गर्दी दिसत नाही असं ते म्हणाले. LPG चा पुरवठा देखील सुरळीत होत आहे. भारत सरकारने वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार कमर्शियल एलपीजी सिलेंडरचा पुरवठा देखील सुनिश्चित करण्यात आला आहे असं डांगे यांनी सांगितलं.

---------------------------------------------------

पीएनजी पुरवठा

पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे निर्माण झालेल्या गॅस तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने पीएनजी पुरवठ्यावर भर दिला आहे. नागपूर जिल्ह्यातही प्रथमच बुटीबोरी

औद्योगिक परिसरात येत्या १० एप्रिलपासून पीएनजी पुरवठा सुरू केला जाणार आहे. पहिल्या टप्प्यात १०० कुटुंबांना पीएनजी पुरवठा सुरू केला जाईल. त्यानंतर जामठा, मिहान, हिंगणा, वानाडोंगरी आणि वाडी परिसरात टप्प्या-टप्प्याने या प्रकल्पाचा विस्तार केला जाणार आहे.

---------------------------------------------------

पाच किलोचे एलपीजी सिलिंडर्स

केंद्र सरकारने पाच किलो वजनाच्या लहान एलपीजी सिलिंडर्सच्या विक्रीत वाढ केली आहे. हे सिलिंडर्स एलपीजी वितरक केंद्रांवर वैध ओळखपत्र दाखवून थेट खरेदीसाठी उपलब्ध आहेत.

---------------------------------------------------

जनगणना

जनगणना संचालनालय महाराष्ट्र आणि जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने जनगणना २०२७ क्षेत्रीय प्रशिक्षक यांच्या तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिराला आज नियोजन भवनात सुरुवात झाली. यात मास्टर ट्रेनरकडून क्षेत्रीय प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षणानंतर क्षेत्रीय प्रशिक्षक हे तालुक्याच्या ठिकाणी प्रगणक आणि पर्यवेक्षकांना प्रशिक्षण देतील. तालुका प्रशिक्षण सत्रे २७ एप्रिल ते ८ मे दरम्यान होतील. जिल्ह्यातील सर्व तालुके, नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रातील जनगणनेसाठी २ हजार ६४६ प्रगणक, तसेच ४४४ पर्यवेक्षक काम करतील.

---------------------------------------------------

खतसाठ्याचा पुरवठा

येत्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्यासाठी मंजूर खतसाठ्याचा पुरवठा सुरू करण्यात आला असून, १ हजार ३०० मेट्रिक टन युरिया खतसाठ्याची पहिली खेप आज अकोल्यात पोहोचणार आहे. जिल्ह्यासाठी १ लाख १४ हजार २०० मेट्रिक टन साठा कृषी आयुक्तालयामार्फत मंजूर करण्यात आला असून आतापर्यंत ४० मेट्रिक टनपेक्षा अधिक खतसाठा उपलब्ध आहे. त्यामध्ये युरिया, डीएपी, एमओपी, संयुक्त खते आणि एसएसपी इत्यादी खतसाठ्याचा समावेश असल्याची माहिती कृषी विकास अधिकाऱ्यांनी दिली.

---------------------------------------------------

हवामान

हवामान -आज नागपूरसह वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता असल्याने वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान मागील २४ तासांत अकोला जिल्ह्यात 37 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सिअस इतकं विदर्भातील सर्वाधिक कमाल तापमान नोंदवण्यात आलं. दरम्यान नागपुरात आज ३५ पूर्णांक 4 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं.

-----------------------------------------------------